TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०११०१

25 वर्षे विकासाची
25
मिरा भाईंदर महानगरपालिका
"माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र.मनपा/उपायुक्त (मु.)/ १३० /२०२६-२७ दिनांक :-२९/०७/२०२६

## // कार्यालयीन आदेश //

**विषय:-** **महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, अधिसूचना, आदेश व इतर महत्वाची पत्रे महासभा कामकाजाकरीता सचिव कार्यालयास उपलब्ध करुन देणे.**

**संदर्भ: -** **१) जा.क्र. मनपा/सचिव/७०/२०२५-२६ दि. २५-२-२०२६.**
**२) जा.क्र: मनपा/सचिव/०८/२०२५-२६ दि. ०९-४-२०२६.**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र शासन तसेच केंद्र शासनाकडून वेळोवेळी शासन निर्णय (GR), परिपत्रके, अधिसूचना, आदेश व इतर महत्त्वाची पत्रे महानगरपालिकेस प्राप्त होत असतात. अशा शासन निर्णयांची माहिती, सन्मा. पालिका सदस्यांना देणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सामान्य प्रशासन विभाग हा महानगरपालिकेमध्ये प्राप्त होणाऱ्या सर्व शासन निर्णय, शासन परिपत्रके, अधिसूचना, शासन आदेश व इतर महत्त्वाच्या पत्रांचा "नोडल विभाग" राहील.

सामान्य प्रशासन विभागाने प्राप्त शासन निर्णयांची डिजिटल नोंदवही ठेवावी.

विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांनी त्यांचे विभागाशी निगडीत प्राप्त झालेले शासन निर्णय, परिपत्रके व अधिसूचना सामान्य प्रशासन विभागास तत्काळ उपलब्ध करुन द्यावेत.

सामान्य प्रशासन विभागाने प्राप्त झालेले सर्व शासन निर्णय, परिपत्रके व अधिसूचना प्राप्त झाल्यापासून त्वरीत सचिव कार्यालयास उपलब्ध करून द्यावेत.

सचिव कार्यालयास महासभेपूर्वी आवश्यक शासन निर्णय उपलब्ध न झाल्यास संबंधित विभाग प्रमुख व सामान्य प्रशासन विभाग प्रमुख यांची जबाबदारी निश्चित करुन संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**मा. आयुक्त यांचे निर्देशान्वये.**

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (मुख्यालय)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

**१) सर्व खाते प्रमुख/विभाग प्रमुख**
**२) महापालिका सचिव**
**३) सहा. आयुक्त (सा.प्र.)**

**प्रत :- माहितीस्तव.**
**मा. आयुक्त**